**बाजारातली खेळणी : काय हवं , काय नको ?**

**भाग एक - काय हवं ?**

**- सूनृता सहस्रबुद्धे**

मुलं घरात सहज उपलब्ध असलेल्या गोष्टी वापरून खूप शिकतात याबद्दल आपण The First Three Institute for Child Development इथे कायमच बोलत आलो आहोत . पातेली , नाड्या , किल्ल्या , उशा - पांघरुणं अशा आपल्याला साध्या वाटणाऱ्या गोष्टी बाळांसाठी मात्र खूप मौल्यवान असतात. तुम्ही जर The First Three Institute for Child Development च्या शिबिरांसाठी किंवा वैयक्तिक सेशन्ससाठी याआधी आला असाल, तर या खेळण्यांशी खेळताना बाळांच्या मेंदूला नेमकं काय मिळतं, याबद्दल तुमचा नक्की अभ्यास झाला असेल ! घरातले खेळच बाळांच्या पसंतीला उतरत असले , तरी बाजारात मात्र बाळांसाठी सतत नवनवीन खेळणी येत राहतात , आणि मोठ्यांना ती भुरळ पाडत राहतात ! यातली काही खेळणी बाळांना शिकायला मदत करतात आणि काही खेळणी शिकण्याच्या प्रक्रियेत बाधा आणतात ! आपण जर बाळांसाठी विकतची खेळणी आणणार असू तर नेमका कशावर खर्च केलेला चांगला हे समजून घेतलेलं बरं , नाही का ?

हा लेख स्पॉन्सर्ड नाही . काही लिंक्स उदाहरणादाखल दिल्या आहेत . कुठल्याही कंपनीनी यासाठी पैसे दिलेले नाहीत!

१. कापडी पुस्तकं आणि बोर्ड बुक्स

अगदी तान्हया बाळालाही पुस्तकं बघायला मिळावीत असं संशोधन आपल्याला सांगतं. या छोट्या वाचकांसाठी खास कापडी पुस्तकं बाजारात मिळतात - चोखायला , फाडून बघायला, चुरगळायला ही अतिशय उत्तम असतात !

अशा प्रकारची कापडी पुस्तकं जरूर बघा :
https://www.amazon.in/Baby.../dp/0241439353/ref=sr_1_1...

बाळ बसायला लागल्यावर त्याला बोर्ड बुक्सची मजा घेता यायला लागते . पानं उलटणं , पुस्तक उलटं सुलटं धरून बघणं, चित्र बघणं, या सगळ्या गोष्टी हे साक्षरतेच्या प्रवासामधले महत्त्वाचे टप्पे असतात ! 'मोठ्यांसाठी 'बाळ'भारती' या पुस्तकात आपण यावर सविस्तर चर्चा केली आहेच.



अशा प्रकारची बोर्ड बुक्स जरूर बघा :
https://www.amazon.in/Baby.../dp/1409305155/ref=pd_sim_4...
दुर्दैवानं , बाळांसाठी मराठीतली कापडी पुस्तकं आणि बोर्ड बुक्स अजूनही आपल्याला सहज बाजारात दिसत नाहीत .

२. कापडी ठोकळे

ठोकळे हातात धरायला शिकणं , ठोकळे एकमेकांवर रचणं , शेजारी शेजारी लावणं , फेकून बघणं, चावून बघणं हे करताना बाळं अनेक गोष्टी शिकत असतात . हे खेळ म्हणजे विज्ञान , भूमिती या विषयांची बाळरूपं आहेत !

वस्तू तोंडात घालणं आणि फेकून बघणं हा मोठं होण्याच्या वाटेवरचा एक अपरिहार्य टप्पा असतो, हे लक्षात घेऊन तयार केलेले खास कापडी ठोकळे बाजारात मिळतात .
https://www.amazon.in/Ks-Kids.../dp/B000KWBO80/ref=sr_1_5...

३. खडू

बसता यायला लागल्यावर आणि वस्तू तोंडात जाण्याचं प्रमाण कमी झाल्यावर, मोठ्यांच्या देखरेखीखाली लहान मुलांना मोठे कागद आणि खडू , रंग जरूर द्यावेत . खडू घेताना ते लांब आणि जाड असतील याची खात्री करून घ्यावी . ज्यावर चित्र काढायचं तो पृष्ठभाग जितका मोठा असेल तितकं चांगलं !

या खडूंनी अगदी जमिनीवरही चित्र काढायला देता येईल .
https://www.amazon.in/Skoodle.../dp/B07KM6KHHS/ref=sr_1_1...
पुढच्या भागात, बाजारातल्या कुठल्या गोष्टी बाळाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत बाधा निर्माण करतात याबद्दल समजून घेऊ .

